# विद्या सहकारी बँक लि.

मुख्य कार्यालय : स.नं. १३५५, प्लॉट नं. ७२, नातूबाग,
शुक्रवार पेठ, पुणे-४११००२. फोन : ०२० २४४७७७४८/४९
वेबसाईट : www.vidyabank.com

## K.Y.C./Re-K.Y.C. पूर्ततेसाठी सूचना

१) बँकेला "आपल्या ग्राहकांना जाणून घ्या" (K.Y.C.) च्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक प्रणालीनुसार, बँकेच्या सर्व ग्राहकांची माहिती अद्ययावत करणे आवश्यक असते. याबाबत यापूर्वी पण ग्राहकांना जाहीर आवाहन दैनिक वृत्तपत्रातून केले होते. तथापि अद्यापि ज्यांनी K.Y.C. ची पूर्तता केली नसेल त्यांनी पुढीलप्रमाणे कागदपत्रे संबंधित शाखेत त्वरित दाखल करणे आवश्यक आहे. -

**१. आपले अलिकडच्या काळातील पासपोर्ट साईजचे २ फोटो.**

**२. ओळखीचा पुरावा.** (उदा. पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, आधार कार्ड इ.)

**३. निवासी पत्त्याचा पुरावा.** (लाईट बील, टेलिफोन बील, पासपोर्ट इ.)

**४. वैयक्तिक खातेदारांशिवाय संस्था, सहकारी संस्था, भागीदारी संस्था, कंपनी, ट्रस्ट व इतर खातेदारांनी जे लागू असेल त्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रांच्या प्रती.**

सबब बँकेच्या ज्या ग्राहकांनी अद्यपि वरीलप्रमाणे K.Y.C. कागदपत्रांची पूर्तता केलेली नसेल, त्यांनी त्वरित संबंधित शाखेशी संपर्क साधावा व K.Y.C. कागदपत्रांची पूर्तता करावी अन्यथा रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकानुसार आपणांस आपल्या खात्यावर दैनंदिन व्यवहार करता येणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी व याची सर्वस्वी जबाबदारी खातेदारांची राहील.

२) तसेच ज्या खातेदारांनी K.Y.C. ची पूर्तता केली आहे त्यांनी त्यांच्या बँकेतील जोखीम वर्गवारीनुसार Re-K.Y.C. सादर करणे आवश्यक आहे. यासंदर्भात आपण जवळच्या शाखेत संपर्क साधावा. जर पूर्वी सादर केलेल्या K.Y.C. कागदपत्रांमधे कोणताही बदल नसेल तर तसे 'Self Declaration' सादर करुनही Re-K.Y.C. ची पूर्तता करता येईल. Self Declaration Form बँकेच्या Web site वर उपलब्ध आहे. तसेच खातेदारांच्या बँकेकडील रजिस्टर्ड मेल आयडीवरुन Self Declaration Form ची Scan Copy बँकेच्या ई-मेल आयडीवर पाठवता येईल.

३) बँकेच्या ज्या खातेदारांनी स्वत:च्या खात्यावर **मागील दोन वर्षे** कोणताही व्यवहार केला नाही, अशा ग्राहकांनी शाखाधिकारी यांना भेटावे व वरीलप्रमाणे K.Y.C. कागदपत्रांची पूर्तता करुन त्यांनी खात्यावर व्यवहार सुरु करावेत.

४) बँकेच्या ज्या खातेदारांनी स्वत:च्या खात्यावर **मागील दहा वर्षे** व त्यापेक्षा अधिक काळ कोणताही व्यवहार केला नसेल तर अशा खातेदारांच्या खात्यांमधील रक्कम दहा वर्षानंतर रिझर्व्ह बँकेच्या DEAF मध्ये वर्ग करावी लागते, याची ग्राहकांनी कृपया नोंद घ्यावी.

ही असुविधा टाळण्यासाठी अशा ग्राहकांनी संबंधित शाखाधिकारी यांना भेटावे व वरीलप्रमाणे K.Y.C. कागदपत्रांची पूर्तता करुन खात्यावर व्यवहार सुरु करावेत, ही विनंती.

पुणे, दि. ०५/१०/२०२४ **मुख्य कार्यकारी अधिकारी**